**<u>नि.फौ.ख.क्र-११८२/२०२२</u>**
**<u>नि.क्र.३४</u>**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०८ यांचा पुरावा</u>**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | सचिन रमेश वनवे, |
| वय | - | ३९ वर्षे, |
| व्यवसाय | - | पोलीस हेड कॉन्स्टेबल, नगर तालुका पोलीस स्टेशन, |
| राहणार | - | तपोवन रोड, - अहमदनगर. |

**<u>सरकारपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ठाकूर यांच्यामार्फत सरतपास सुरु</u>**

१. दिनांक ०२.०७.२०२१ रोजी मी नगर तालुका पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी वरिष्ठांच्या आदेशानुसार माझ्याकडे गु.र.नं. ३६४/२०२१ चा तपास ठाणे अंमलदार पोलीस नाईक श्री शिंदे यांनी सोपविला. सदर आदेशाची प्रत आता मला दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ठाणे अंमलदार श्री शिंदे यांची सही आहे. सदर आदेशास **<u>निशाणी ३५</u>** देण्यात येते. सदर आदेशासोबत मला मुळ फिर्याद, दैनिक अहवालाची प्रत व फिर्यादीची ऑन-लाईन प्रत मिळाली होती.

२. तपासादरम्यान मी घटनास्थळी जावून फिर्यादीने दाखविलेला गुन्हयात वापरलेला एक लोखंडी गज दोन पंचांसमक्ष जप्त करुन त्यावर पंचांच्या सहयांचे कागदी लेबल लावले व तसा घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. सदर पंचनामा आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही असून पंचांच्या सहया आहेत. सदर पंचनामा **<u>निशाणी २९</u>** कडे आहे. सदर जप्त लोखंडी गज मुद्देमाल पावतीनुसार मुद्देमाल कारकुन यांच्याकडे जमा केला. सदर मुद्देमाल पावती आता मला दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>निशाणी ३६</u>** देण्यात येते. त्यानंतर मी गुन्हयाशी संबंधित साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तसेच मी जखमी फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तसेच आरोपीला मी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१-अ (१) अन्वये नोटीस दिली. तपासाअंती आरोपींविरुध्द भरपूर पुरावा मिळून आल्याने मी त्यांच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आता मला जप्त लोखंडी गज आर्टीकल अ दाखविण्यात आला. तो तोच आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र.१ व ३ न्यायालयासमोर हजर आहेत. (आरोपी क्र.२ ची हजेरी निशाणी ३३ वरील

आदेशान्वये माफ करण्यात आली.)

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपींतर्फे वकील श्री. आर.पी. गोरे यांचे मार्फत उलटतपास शपथेवर सुरु</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३५ कडील तपासाच्या लेखी आदेशामध्ये वेळ नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १३ कडील फिर्यादीवर वेळ नमूद नाही. मी फिर्यादीस दवाखान्यात जाण्याबाबत यादी दिली नव्हती. फिर्यादीस ठाणे अंमलदार यांनी दवाखान्यात जाणेबाबत यादी दिली होती. सदर यादी मी तपासादरम्यान हस्तगत केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान जबाब नोंदविलेले सर्व साक्षीदार फिर्यादीचे नातेवाईक आहेत. साक्षीदार स्वतः सांगतात की, सदर साक्षीदार हे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याने त्यांचे जबाब नोंदविले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ/जप्ती पंचनामा पोलीस ठाण्यामध्ये तयार केला होता. घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार क्र.१ लिंबराज डोंगरे हा फिर्यादी यांचा व्याही व साक्षीदार क्र.२ चेतन लांडगे हा फिर्यादी यांचा जवळचा नातेवाईक आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा तपासादरम्यान मिळून आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीस मदत व्हावी म्हणून मी चुकीच्या दिशेने तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.</u>**

दि.१८.१२.२०२५.
वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष

SACHIN SHIVAJIRAO UBALE
Digitally signed by SACHIN SHIVAJIRAO UBALE
Date: 2025.12.18 17:33:41 +0530

**(एस.एस. उबाळे)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**कोर्ट नं. ०८, अहमदनगर.**